# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.२१०००१/२१/अ.क्र.५८७०/२४/०१**

**श्री. शेखर शेट्टी**
बी/२५१, ग्रँड पराडी, ऑगस्ट क्रांती मार्ग,
केम्प्स कॉर्नर, मुंबई-४०० ०३६.

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (मालमत्ता)**
जी/उत्तर विभाग, सहाय्यक आयुक्त जी/उत्तर विभाग
महापालिका कार्यालय,हरिश्चंद्र येवले मार्ग, दादर (प.),
मुंबई-४०० ०२८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त जी/उत्तर विभाग**
सहाय्यक आयुक्त जी/उत्तर विभाग महापालिका कार्यालय
हरिश्चंद्र येवले मार्ग, दादर (प.) मुंबई-४०० ०२८.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २६.१२.२०२४**

अपीलकर्ता : अनुपस्थित. ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे नोटीस दि. ०७.१२.२०२४ रोजी प्राप्त झाली आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित

प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १४.०१.२०२० | - | ०६.०३.२०२० | २१.१२.२०२० |

अपिलकर्तांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे दि. २१.१२.२०२० रोजीचे आदेश संलग्न करुन दि.०४.०१.२०२१ रोजी आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि. १४.०१.२०२० अन्वये खालीलप्रमाणे मुद्येनिहाय माहिती विचारलेली आहे :-

1. We are the owners of the above mentioned building and we want to know:-
2. In who's name are the above mentioned rooms i.e. (room no: 60A and Room no:13) are registered in your records.
3. we also want to know since how long the rooms have been registered in their respective names and the name of the occupants residing in the said room before them.
4. we also want the certified photocopy of the current rent receipts available in your office for the above mentioned rooms.

जन माहिती अधिकारी यांचे उत्तर प्राप्त न झाल्यामुळे प्रथम अपिल अर्ज दाखल केला आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त जी/उत्तर विभाग यांनी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले की, अपीलार्थी यांना विहीत वेळेत उत्तर व माहिती दिली असली तरी दिलेली माहिती अपूर्ण असल्याचे निदर्शनास येते. जन माहिती अधिकारी यांनी ०७ दिवसांत अपीलार्थी यांना माहिती अर्जात नमूद केलेल्या भाडेकरुंच्या सध्याच्या भाडे पावतीची छायांकित प्रती व कार्यालयीन उपलब्ध माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या नियमानुसार देय माहिती नि:शुल्क द्यावी" असे आदेश पारित केले.

अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि. ०४.०१.२०२१ रोजी माहिती मिळाली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी यांना सुनावणी नोटीस प्राप्त झाली असून कोणतीही पूर्व सूचना न देता अनुपस्थित आहे. विद्यामन जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता अधिकारी (प्र.) जी/उत्तर विभाग यांचे प्रतिनिधी मुख्य लिपीक (मालमत्ता) जी/उत्तर विभाग श्रीमती श्वेता सोनावणे उपस्थित आहे.

विद्यामन जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता अधिकारी (प्र.) जी/उत्तर विभाग यांचे प्रतिनिधी मुख्य लिपीक (मालमत्ता) जी/उत्तर विभाग, श्रीमती श्वेता सोनावणे यांनी आयोगाकडे असे सादर केले की, जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता अधिकारी (प्र.) जी/उत्तर विभाग यांनी दि. १३.०२.२०२० च्या पत्रान्वये अपीलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे.

अभिलेखावरुन असे स्पष्ट होते की, जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता अधिकारी (प्र.) जी/उत्तर विभाग यांनी वेळेत उत्तर व माहिती दिली आहे.

प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पुन्हा माहिती देण्याचे आदेशित केले असून जन माहिती अधिकारी यांनी दि. १३.१०.२०२२ च्या पत्रान्वये अपीलार्थी यांना पुन्हा माहिती दिली व सदर पत्रावर अपीलार्थी यांनी माहिती स्विकारण्याची स्वाक्षरी केली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता अधिकारी (प्र.) जी/उत्तर विभाग यांनी अपीलार्थी यांना माहिती दिली आहे.

सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

26-12-2024

**मुंबई**
**दिनांक :२६.१२.२०२४**

**( डॉ. प्रदीप व्यास )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra